




# संरक्षणशास्त्र

## (कार्यपुस्तिका)

### इयत्ता नववी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.





शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ही कार्यपुस्तिका निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# संरक्षणशास्त्र

## (कार्यपुस्तिका)

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे

7JKQGI

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

**प्रथमावृत्ती : २०१७**
**चौथे पुनर्मुद्रण : २०२१**

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**संरक्षणशास्त्र विषय समिती**

प्रा. डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
ब्रिगेडिअर एस. जी. गोखले (निवृत्त), सदस्य
कर्नल डॉ. प्रमोदन मराठे (निवृत्त), सदस्य
डॉ. विजय जाधव, सदस्य
डॉ. शांताराम बडगुजर, सदस्य
डॉ. अजयकुमार लोळगे, (सदस्य सचिव)

**नकाशाकार**

श्री. रविकिरण जाधव
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**निमंत्रित**

श्री. वैजनाथ काळे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. रमेश रामचंद्र माळगे

**संयोजक**

डॉ. अजयकुमार लोळगे
विशेषाधिकारी कार्यानुभव व
प्र. विशेषाधिकारी, आरोग्य व शारीरिक शिक्षण
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**अक्षरजुळणी**

रूना ग्राफिक्स, पुणे

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. विनोद गावडे, निर्मिती अधिकारी
श्रीमती मिताली शितप, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद**

७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

एन्/पिबी/२०२१-२२/(२०,०००)

**मुद्रक**

मे. डिजीटल प्रिंट सिस्टीम ॲन्ड सोल्युशन्स प्रा. लि., अहमदनगर

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी,
नियंत्रक,
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई - २५

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता नववीच्या वर्गात तुम्हां सर्वांचे स्वागत आहे. 'संरक्षणशास्त्र' या विषयाची कार्यपुस्तिका तुमच्या हाती देताना आम्हांला विशेष आनंद होत आहे.

भारतीय लष्करी व निमलष्करी दलांची संक्षिप्त माहिती पुस्तिकेत दिलेली आहे. जागतिकीकरणाच्या शतकात आवश्यक असलेली संरक्षणशास्त्र विषयक माहिती आत्मसात करण्यासाठी व संरक्षणशास्त्र क्षेत्रातील करिअरच्या यशस्वी वाटचालीसाठी या विषयातून आवश्यक ते मार्गदर्शन तुम्हांला मिळेल, असा विश्वास वाटतो.

तुम्हांला माहीतच आहे, की संरक्षणशास्त्र विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संरक्षणशास्त्र या कार्यपुस्तिकेचा मूळ हेतू तुमच्यामध्ये राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहित, देशप्रेम या मूल्यांची जोपासना व्हावी हा आहे. चर्चा, क्षेत्रभेटी, मुलाखत, भूमिका अभिनय अशा अनेक कृतींतून तुम्ही हा विषय अभ्यासणार आहात. हे सर्व उपक्रम तुम्ही आवर्जून करा. या उपक्रमातून तुमच्या विचारप्रक्रियेला चालना मिळेल. चर्चेतून मिळालेले मुद्दे व माहिती लिहिण्यासाठी पुस्तिकेत पुरेशी जागा दिलेली आहे. तसेच आवश्यक तेथे तुमच्या शिक्षकांची, पालकांची व वर्गातील सहकाऱ्यांची मदत घ्या.

आजच्या तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात संगणक, स्मार्टफोन हे तर तुमच्या परिचयाचे आहेतच. कार्यपुस्तिकेतून अभ्यास करताना माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या साधनांचा सुयोग्य वापर करा जेणेकरून तुमचे अध्ययन सुकर होईल.

कार्यपुस्तिका वाचताना, अभ्यासताना आणि समजून घेताना तुम्हांला त्यातील आवडलेला भाग तसेच अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी, पडणारे प्रश्न आम्हांला जरूर कळवा.

तुम्हांला तुमच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा !

(डॉ. सुनिल मगर)
**संचालक**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

**पुणे**
**दिनांक :** २८ एप्रिल २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# संरक्षणशास्त्र (Defence Studies)

**अध्ययन-अध्यापन व उपक्रम राबवण्याच्या संबंधीचा दृष्टिकोन :**

संरक्षणशास्त्र या विषयाचा रोख मुख्यतः राष्ट्रीय सुरक्षा हा आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना देशासमोरील बाह्य आणि अंतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करते. आज राष्ट्रीय सुरक्षा या संकल्पनेची व्याप्ती केवळ सीमा रक्षणापुरती मर्यादित राहिली नाही तर त्यामध्ये राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक समस्यांचाही समावेश केला जातो. या विषयातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहित, देशप्रेम या मूल्यांची जोपासना व्हावी हा हेतू आहे. भविष्यकाळात या क्षेत्रात करिअर (सेवासंधी) करण्याच्या दृष्टीने या विषयाची उपयुक्तता आहे. इयत्ता नववीच्या 'संरक्षणशास्त्र' या पुस्तकात भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा विषयक समस्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. त्यात प्रामुख्याने राष्ट्रीय सुरक्षा ही संकल्पना आणि भारतीय लष्करी व निमलष्करी दलाची माहिती दिली आहे.

इयत्ता दहावीमध्ये आपत्ती व्यवस्थापन तसेच भारतासमोरील अंतर्गत आव्हाने यांचा अभ्यास करणार आहोत. हे पुस्तक विद्यार्थ्यांनी कार्यपुस्तिका म्हणून वापरावे. यातील आशय अभ्यासून त्यासंबंधी गटात, वर्गात, शिक्षकांसोबत तसेच विषयतज्ज्ञांशी चर्चा करून तसेच काही क्षेत्रभेटी, मुलाखती यांच्या मदतीने या कार्यपुस्तिकेत पाठाखाली दिलेल्या रिकाम्या जागेत माहिती लिहावी. यासाठी विद्यार्थ्यांनी इंटरनेट, वर्तमानपत्रे, वाचनालय, संदर्भ साहित्य यांचा आधार घ्यावा. तसेच विविध क्षेत्रभेटींचे आयोजन शिक्षकांनी करणे अपेक्षित आहे.

**अध्ययन व अध्यापन :**

(१) प्रत्येक पाठ्यघटकाची माहिती थोडक्यात दिलेली आहे. त्या आधारे शिक्षकांनी तो विषय समजावून सांगणे अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक ती संदर्भ सेवा वापरावी.

(२) दिलेल्या पाठ्यांशाचे अध्ययन अधिक प्रभावी व्हावे या दृष्टीने उपक्रमात, प्रत्येक विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग घ्यावा. उपक्रमातील बाबींवर चर्चा करून तो उपक्रम लेखी स्वरूपात पूर्ण करून घ्यावा.

(३) आठवड्यातून एकदा विद्यार्थ्यांकडून वृत्तपत्रे, मासिके यांतून भारताच्या सुरक्षाविषयक समस्यांबाबतच्या बातम्यांवर चर्चा घडवून विद्यार्थ्यांना स्वमत मांडण्यास संधी द्यावी.

(४) उपलब्ध परिस्थितीनुसार सुचवलेल्या क्षेत्रभेटींचे आयोजन करावे. यातून नेतृत्व-सहकार्य, संवाद-कौशल्ये, विकसन या गुणांचा विकास होईल.

**या विषयाचे मूल्यमापन :**

(१) स्वतंत्र लेखी स्वरूपात परीक्षा नाही.

(२) कार्यपुस्तिकेत दिलेल्या लेखी कामासाठी ४०% भारांश आहे.

(३) चर्चा, क्षेत्रभेटी, मुलाखती, भूमिका, अभिनय यांसाठी ६०% भारांश आहे.

(४) प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करून विद्यार्थ्यांना श्रेणी द्यावी.

## संरक्षणशास्त्र विषयक क्षमता : इयत्ता ९ वी

इयत्ता ९ वी च्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

| अ.क्र. | घटक | क्षमता विधाने |
|---|---|---|
| १. | ❍ राष्ट्रीय सुरक्षा<br>❍ राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बाह्य) | ❍ राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रीय मूल्ये वृद्धिंगत करणे.<br>❍ राष्ट्रीय सुरक्षा, राष्ट्रहित या संकल्पना समजून घेणे.<br>❍ राष्ट्रीय सुरक्षेपुढील बाह्य आव्हाने समजून घेणे.<br>❍ भारत व शेजारील देशाशी असलेले संबंध जाणून घेणे.<br>❍ नकाशा वाचन कौशल्ये विकसित करणे. |
| २. | ❍ भारतीय संरक्षण व्यवस्था<br>❍ भारतीय स्थलसेना<br>❍ भारतीय नौसेना<br>❍ भारतीय वायुसेना | ❍ भारतीय सेनादले, रचना व कार्य समजून घेणे.<br>❍ तिन्ही सेनादलातील शस्त्र-अस्त्रांची माहिती करून घेणे.<br>❍ सेनादलातील अधिकाऱ्यांचे हुद्दे समजून घेणे.<br>❍ संरक्षणाच्या दृष्टिकोनातून भारतीय सागरी किनाऱ्याचे व नौसेनेचे महत्त्व समजून घेणे.<br>❍ राष्ट्रीय आपत्ती काळात सेनादलाचे महत्त्व जाणणे. |
| ३. | ❍ संरक्षणाच्या दुय्यम संघटना<br>❍ पोलीस संघटना | ❍ देशातील संरक्षणाच्या दुय्यम संघटना व त्यांचे कार्य समजून घेणे.<br>❍ पोलीस दलांचे राष्ट्रीय सुरक्षेतील योगदान अभ्यासणे.<br>❍ दुय्यम संरक्षण दलासंबंधी विविध मुलाखतींमधून प्रेरणा मिळवणे. |
| ४. | ❍ लष्करातील सेवा संधी | ❍ लष्करी सेवेतील सेवा संधी आणि प्रवेश प्रक्रिया समजून घेणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय सुरक्षा | १ |
| २. | राष्ट्रीय सुरक्षा आव्हाने (बाह्य) | ७ |
| ३. | भारतीय संरक्षण व्यवस्था | १३ |
| ४. | भारतीय स्थलसेना | १९ |
| ५. | भारतीय नौसेना | २६ |
| ६. | भारतीय वायुसेना | ३२ |
| ७. | संरक्षणाच्या दुय्यम संघटना | ४१ |
| ८. | पोलीस दले | ४७ |
| ९. | लष्करातील सेवा संधी | ५१ |